महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग

## Government Medical College & Hospital, Sindhudurg

Near Civil Hospital, A/P.Oras, Ta.-Kudal, Dist. Sindhudurg
Phone No.(02362 228355) Pin-416812 E-mail ID-deangmchsindhudurg@gmail.com

जा.क्र.शावैमवरुसिं/दरपत्रक मागणी/ 4297 /२०२६ दिनांक : 10/०९/२०२६

## संस्थेच्या संकेतस्थळावरुन दरपत्रके मागणी

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, सिंधुदुर्ग या दोन्ही संस्थेतील आयकर कपाती तसेच त्या अनुषंगिक कामकाजासाठी सनदी लेखापाल नियुक्त करण्याकरिता पुर्वी झालेली निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त विषयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, सिंधुदुर्ग या दोन्ही संस्थेतील कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांचे दरमहा वेतनातून आयकर कपात तसेच नियोक्ता २४Q मध्ये पगारातून कपात करण्यात आलेल्या आयकराचे (TDS) रिटर्न भरावयाचा असल्याने तातडीने करण्यासाठी आपणाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरहू दरपत्रके दर निश्चित झाल्यानंतर दोन्ही संस्थांमधील कर्मचाऱ्यांसाठी लागू राहतील. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग या संस्थेच्या नावे दोन लिफाफ्यातून दिनांक २४ /०९/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावीत. विलंबाने सादर केलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

निविदा धारकाने दोन लिफाफा पध्दतीने निविदा भरण्याची आहे.

१. **तांत्रिक लिफाफा**:- या मध्ये आवश्यक सर्व कागदपत्रे, उदा. C.A प्रमाणपत्र, अनुभव, शासकीय संस्थेचा अनुभव, नजिकच्या शासकीय संस्थेमध्ये किमान ५०० ते ८०० कर्मचारी यांचे TDS चे काम पूर्ण केल्याचा अनुभव, जी एस टी सर्टिफिकेट.

२. **कमर्शियल लिफाफा**:- दर

३. सेवा पुरवठाधारकाकडे जीएसटी नोंदणी क्रमांक असणे अत्यावश्यक आहे.

| आयकर कपात सेवा | | |
|---|---|---|
| 1 | Preparation Annual Salary Sheet of All Employees (12 Month's Salary Sheets) Preparation of Form No 16 part A and part B | |
| 2 | Preparation of E-TDS Return Quarterly 26Q-Non Salary and Form 16 A | |
| 3 | Preparation of GST TDS Return (GSTR-7) | |
| 4 | Preparation of E-TDS Revised Return 24 Q or 26 Q | |

उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या आयकर कपाती दरपत्रक सादर करताना त्यावर अनुक्रमांक , नाव नमुद करण्यात यावे. तसेच या संस्थेस प्राप्त झालेले दरपत्रके खरेदी समिती समोर दिनांक २५ /०९/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील. आपणांस दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेत भाग घ्यावयाचा असल्यास नियोजीत वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

Govt. Medical College and Hospital • Sindhudurg •

डॉ. अमोल व. शिंदे,
(अधिष्ठाता)
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,
सिंधुदुर्ग

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय
महाविदयालय व रुग्णालय
सिंधुदुर्ग.

कृ. मा.प

अटी व शर्ती:-

१. सदर दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात देण्यात यावेत. तसेच लिफाफ्यावर सामुग्रीचे नाव नमुद करण्यात यावे. सदरील दरपत्रके अधिकृत लेटरहेडवर सादर करावे. C.A प्रमाणपत्र, अनुभव, शासकीय संस्थेचा अनुभव, नजिकच्या शासकीय संस्थेमध्ये किमान ५०० ते ८०० कर्मचारी यांचे TDS चे काम पूर्ण केल्याचा अनुभव, जी एस टी सर्टिफिकेट.
२. प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. तसेच वरील सर्व कामे ही एकाच फर्मच्या अखत्यारित संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल निविदा देण्याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
३. दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावाप्रमाणे असावेत. सदरच्या सेवेचे सर्व कर हे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. तसेच उपरोक्त सेवा आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त आठ (०८) दिवसात सेवा पुरवण्यात सुरवात करावी. सदरील सेवा सुरू करण्यात विलंब झाल्यास देयकामधून नियमानुसार कपात करण्यात येईल.
४. उपरोक्त नमुद सेवा हि उत्कृष्ट असणे आवश्यक आहे.
५. सदर बाबींसाठी कोणत्याही सेवेचे शासनाचे दरकरार उपलब्ध झाल्यास सदरील भरण्यात आलेले दरपत्रक वगळण्यात येतील यांची नोंद घ्यावी.
६. संबंधितांकडून सदरच्या सेवेचा मागील अनुभव असल्यास त्याची प्रत सोबत साक्षांकित करून देण्यात यावे.
७. दरपत्रकांवर नमुद सेवेचा हमी कालावधी नमुद करावा.
८. शासकीय नियमानुसार शनिवार व रविवार, तसेच जोडून आलेली सार्वजनिक रजा वगळून दरपत्रके सादर करण्यात यावीत, याची नोंद घ्यावी.
९. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग यांना आहे.
१०. कमर्शिअल व तांत्रिक लिफाफे स्वतंत्र असावेत. एकाच लिफाफ्यामध्ये दोन लिफाफे असू नयेत.
११. सविस्तर अटी व शर्ती वाचूनच दरपत्रके भरण्यात यावेत.

प्रत-

स्वीय सहाय्यक शाखा, श्री,विलास राठोड, (उच्च्श्रेणी लघुलेखक) यांनी सदरची जाहिरात संकेतस्थळावर दि. १० / ०९/२०२६ रोजी प्रसिध्द करावी.